# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.३३/२०२३

श्री.रत्नाकर आनंदराव खराडे
रा.१५८,शुक्रवार पेठ, कराड, जि.सातारा } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा.
२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,कराड, जि.सातारा. } वि.प.

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि. इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.रत्नाकर आनंदराव खराडे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२१/०९/२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी वरील नमूद महाविद्यालयात दि.०१/०७/२०११ पासून सलगपणे सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. माझी निवड विद्यापीठ निवड समिती मार्फत झाली असून मी सेवेत कायम आहे. १. महाविद्यालयात रूजू झाल्यापासून (दि.०१/०७/२०११) महाविद्यालयाने नियमानुसार व्हेकेशन (उन्हाळी व हिवाळी) दिलेल्या नाहीत (फक्त ०५ दिवस प्रत्येकी) तरी सदरील व्हेकेशन कालावधीत कार्यरत असल्याने मला सदरील (न दिलेल्या व्हेकेशन) दिवसांचा पगार देय असून तो देण्यात यावा. २. माननीय प्राचार्य, मा.उपप्राचार्य, मा.व्यवस्थापन यांनी मी दि.०२ मे २०२३ रोजी शिवाजी विद्यापीठात नियम व नियमित पगार भत्तेंसहित मिळणेबाबत तक्रार केलेपासून माझेवर सुडबुध्दीने कारवाया केलेल्या व करत आहेत. ०२ मे २०२३ पूर्वी माझेवर कोणतेही आरोप नव्हते व चांगले कामगिरीमुळे मला विविध महत्वाच्या जबाबदा-या व पदोन्नती दिलेली होती. ३. ०२ मे २०२३ नंतर माझी अन्यायकारकरित्या पदावनती करण्यात आली.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारी ही खालील बार्बीबाबत आहे.

१.नियमाप्रमाणे व्हेकेशन दिली नाही

२.विभागप्रमुख पदावरून कमी केले.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्था, महाविद्यालयाने दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये तक्रारदार यांची विद्यापीठ निवड समितीमार्फत दि.२४/०८/२०१६ रोजी नियुक्ती झाली असून तक्रारदार हे नोकरीमध्ये दि.२४/०८/२०१७ रोजी कायम झाले आहेत. सबब तक्रारदार हे नोकरीत कायम झालेपासून त्यांना व्हेकेशन लागू केल्या आहेत. त्यानुसार सन २०१७ ते २०१९ अखेर त्यांना ८७ दिवसाचे व्हेकशन दिलेले असून उर्वरीत ९३ दिवसांच्या व्हेकेशनचे ३१ दिवस अर्जित रजेत रूपांतर करून त्या तक्रारदार यांचे सेवापुस्तकात जमा करून त्याची नोंद घेण्यात आलेली असल्याचे नमूद करून पुराव्याखातर तक्रारदार यांच्या सेवापुस्तकाच्या पानाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. तसेच सन २०२० मध्ये कोरोना रोगाच्या साथीमुळे विद्यापीठाने व्हेकेशन दिलेल्या नाहीत. सन २०२२-२३ मध्येही विद्यार्थ्यांचे नुकसान भरून काढणेसाठी विद्यापीठाने व्हेकेशन दिलेल्या नसल्याचे कथन केले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

१. प्रस्तूत प्रकरणामध्ये तक्रारदार यांनी सदर महाविद्यालयामध्ये आपण दि. ०१/०७/२०११ पासून दि.०६/११/२०२३ पर्यंत सलगपणे सहा.प्राध्यापक पदावर कार्यरत असून सन २०११ ते अर्ज दाखल दिनांकापर्यंत विद्यापीठ परिनियमातील तरतूदीनुसार आपणास व्हेकेशन प्राप्त व्हावी असे नमूद केले आहे. तसेच लेखी युक्तीवादामध्ये प्रत्येक वर्षी उन्हाळी व्हेकेशन ४५ दिवस व हिवाळी व्हेकेशन ३० दिवस याप्रमाणे गणना करून सन २०११ ते २०२३ या कालावधीत एकूण ८२५ दिवस व्हेकेशन झालेले असून त्यापैकी १०२ दिवसांचे व्हेकेशन आपणास मिळालेले आहेत व उर्वरीत ७२३ दिवसांच्या व्हेकेशनचा पगार स्वरूपात रक्कम मिळावी अशी मागणी केली आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षक नियुक्तीच्या एक वर्षाच्या कालावधीनंतर व्हेकेशन मिळण्यास पात्र ठरतात असे कथन करून त्याच्या पृष्टार्थ तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे क्रं.४/आस्था/परिपत्रक/२०१६/२५० दि.१७ जून २०१६ चे परिपत्रकाची प्रत सादर केली आहे.

दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर दाखल केलेले लेखी व तोंडी कथने विचारात घेतली असता समितीचे मत असे की, तक्रारदार यांचे कथनानुसार सन २०११ पासून महाविद्यालयात सलगपणे सहा. प्राध्यापक पदावर कार्यरत असल्याचे म्हटले आहे. तसेच सन २०११ पासून ते अर्ज दाखल दिनांकापर्यंतचे नियमानुसार देय असणारे व्हेकेशन मिळणेची मागणी केली आहे. तथापि महाविद्यालयाने दाखल केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार हे दि.२४/०८/२०१६ रोजी सेवेत रूजू झाले व त्यांचे कर्न्फमेशन दि.२४/०८/२०१७ रोजी झाले आहे. त्यामुळे तक्रारदारांना कर्न्फमेशन मिळाल्यानंतर व्हेकेशन लागू करण्यात आलेल्या आहेत असे म्हटले आहे. यासंबंधी तक्रारदार यांनी सन २०१२ मधील नियुक्ती आदेश जोडला आहे. त्यानंतर तक्रारदार यांची नियमित नियुक्ती दि.२४/०८/२०१६ पासून असल्याचे अर्जासोबत जोडलेल्या नियुक्ती आदेशावरून दिसून येते. उपरोक्त बाबी अवलोकनी घेता, विद्यापीठ परिनियमातील तरतूदीनुसार नियमित शिक्षकांना विद्यापीठाने विहित केलेल्या कालावधीनुसार व्हेकेशन उपलब्ध होत असते. तक्रारदार यांनी समितीसमोर दाखल केलेल्या दि.१६/०५/२०२४ रोजीच्या लेखी युक्तीवादामध्ये व्हेकेशनचा ताळेबंद नमूद केला असून त्यानुसार सन २०११ पासून व्हेकेशन मिळण्याची मागणी केली आहे. तथापि तक्रारदार यांनी त्यांचा सन २०१२ मधील नियुक्ती आदेश जोडला आहे. त्यांची सेवा सन २०१५ पर्यंत कशा स्वरूपाची आहे किंवा त्याचे नियुक्ती आदेश सोबत जोडलेले नाहीत. सबब या कालावधीमधील व्हेकेशनबाबत निर्णय होवू शकत नाही परंतु महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ७९ नुसार तक्रारदार हे नियमित झालेपासून म्हणजेच सन २०१७ पासून व्हेकेशन मिळणेस पात्र आहेत असे समितीचे मत आहे.

तक्रारदार यांनी उन्हाळी व्हेकेशन ४५ दिवस व हिवाळी व्हेकेशन ३० दिवस असल्याचे कथन केले आहे. विद्यापीठ परिनियम २०१ नुसार व्हेकेशनचा कालावधी हा विद्यापीठ अधिकार मंडळाने ठरवून दिलेला असेल अशी तरतूद आहे. वेतन, सेवाशर्ती, रजा व सुट्टया या सर्व बाबींबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, शिखर संस्थेने निर्धारीत केलेनुसार व राज्य शासनाने त्यास स्विकारलेनुसार देय होतात. त्याअनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळ शैक्षणिक वर्षाचे सत्र ठरवते व त्याप्रमाणे परिपत्रक सर्व महाविद्यालयांना प्रसिध्द केले जाते. सत्र प्रारंभ व सत्र समाप्ती याचा कालावधी, शैक्षणिक तास, शैक्षणिक उपक्रम इ. चा विचार होवून तो कालावधी निश्चित केला जातो. दोन सत्रामधील कालावधीमध्ये व्हेकेशन्स दिले जाते. त्यानुसार महाविद्यालयाकडून व्हेकेशन दिली जाते. दोन्ही पक्षांनी मांडलेली माहिती व कागदपत्रांवरून उन्हाळी ४५ दिवस व हिवाळी ३० दिवस अशी ठरावीक व्हेकेशन असल्याचे दिसून येत नाही. शिखर संस्था व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सत्र व व्हेकेशनची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. विद्यापीठाने प्रसिध्द केलेली परिपत्रके अवलोकनी घेता,

सत्र प्रारंभ व सत्र समाप्ती या कालावधीचा विचार करता तो कमी जास्त कालावधी दिसून येतो. संस्थेने दिलेल्या म्हणण्यामधील तक्त्यामध्ये तक्रारदार यांना यापूर्वीच काही दिवसांचे व्हेकेशन दिले आहेत. परंतु त्या अपु-या असल्याची तक्रारदार यांची तक्रार आहे. याबाबत समितीने दोन्ही पक्षांना यासंबधीची कागदपत्रे विद्यापीठामध्ये घेवून त्याची पडताळणी करणेस निर्देश दिले. त्यानुसार व्हेकेशनबाबतचे मूळ रेकॉर्ड घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधींनी दि.३०/०४/२०२४ रोजी विद्यापीठात हजर राहून तक्रारदार यांचेसोबत त्याची पडताळणी केली. पडताळणी केलेल्या अहवालानुसार तक्रारदार यांनी दि.१६/०५/२०२४ रोजीच्या लेखी युक्तीवादामध्ये महाविद्यालयाकडून मिळालेल्या व्हेकेशनचा ताळेबंद नमूद केला आहे. पडताळणीनुसार मिळालेल्या व्हेकेशन या दोन्ही पक्षास मान्य आहेत, परंतु महाविद्यालयात रूजू झालेपासून नियमानुसार व्हेकेशन (उन्हाळी व हिवाळी) दिलेल्या नाहीत अशी तक्रारदाराची मागणी आहे. यानंतर संस्थेने तक्रारदार यांच्या व्हेकेशनच्या सादर केलेल्या ताळेबंदानुसार सन २०१७ ते २०१९ मधील शिल्लक ९३ दिवसाच्या व्हेकेशनचे ३१ दिवस अर्जित रूपात रजा दिल्या आहेत असे नमूद केले आहे. परिनियम २०० (ए) मध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, ज्या शिक्षकांना व्हेकेशन देय आहेत ते शिक्षक अर्जित रजेस पात्र असणार नाहीत. तथापि ज्या शिक्षकांना व्हेकेशन देण्यात आलेले नाही. त्यांना अर्जित रजा अनुज्ञेय राहिल. परिनियम २०० (बी) अन्वये महाविद्यालयातील प्राचार्य किंवा मान्यता प्राप्त संस्थेचे मुख्य हे कार्यालयीन कामकाजाचे प्रमुख असलेने त्यांना नॉन व्हेकेशन ऑफिसर असे धरले जाईल आणि ते, सामान्यतः शिक्षकांना अनूज्ञेय असणा-या व्हेकेशनास पात्र असणार नाहीत. तथापि असे प्राचार्य किंवा प्रमुख हे कामकाज केलेल्या दिवसांच्या प्रमाणात १/११ प्रमाणात अर्जित रजा मिळणेस पात्र असतील, तथापि त्यावर १८० दिवस बंधन घालून देण्यात आले आहे. हयाचा अर्थ असा की, सर्व शिक्षकांना अर्जित रजा मिळण्याचा हक्क प्राप्त आहे. ज्या ठिकाणी काही कारणास्तव हा व्हेकेशन कालावधी कमी जास्त करून शिक्षकांना व्हेकेशन कालावधीत काही काम करावयास लागल्यास त्या दिवसांच्या प्रमाणात त्यांना व्हेकेशन नाकारले असे समजण्यात येवून त्या नाकारलेल्या व्हेकेशनऐवजी तितक्या दिवसांची अर्जित रजा मिळणेस पात्र आहे. जाब देणा-यातर्फे देय व्हेकेशन व दिलेली व्हेकेशन याचा ताळेबंद हया प्रकरणात दाखल केलेला आहे. त्यावरून स्पष्ट होते की, सन २०१७ ते २०१९ या कालावधीकरीता जे देय व्हेकेशन तक्रारदार यांना उपलब्ध होते. त्यापैकी एकूण १५५ दिवसांचे व्हेकेशन त्यांना देण्यात आलेले नाही आणि त्याकरीता तक्रारदार यांचे रजा खात्यात ३१ दिवसांची अर्जित रजा जमा केलेली आहे असे नमूद केले आहे. यावरून व्हेकेशन प्रतिबंधित कालावधी करीता काही प्रमाणात अर्जित रजा संबधिताच्या रजा खात्याला जमा करता येते याला पुष्ठी मिळते आणि ही बाब जाब देणा-याने स्वतः मान्य केलेली आहे. त्यामुळे कायद्याप्रमाणे तक्रारदारांना देय

असणारी व्हेकेशन आणि त्यांना प्रत्यक्ष देण्यात आलेली व्हेकेशन सन २०१७ ते २०२३ या कालावधीतील व्हेकेशन त्यांना विद्यापीठ परिपत्रकानुसार देय आहे. तथापि व्हेकेशन कालावधीमध्ये कोव्हीड कालावधी सन २०२०-२०२१ हा व्हेकेशनकरीता ग्राहय धरणे उचित होणार नाही. सामान्यतः विद्यापीठ परिपत्रकानुसार शिल्लक व्हेकेशन देय असणा-या प्रमाणामध्ये तक्रारदार यांना अर्जित रजेमध्ये रूपांतर करून मिळण्यास पात्र आहेत. त्याप्रमाणे तक्रारदार हे अर्जित रजा वर्ग करून घेणेस पात्र आहेत.

२. तक्रारदाराने देय असणा-या अर्जित रजेऐवजी देय दिवसांचे रोखीकरण करून मागितलेले आहे. या मागणीच्या अनुषंगाने कोणत्याही परिनियम, तरतूदीचा आधार दिलेला नाही. अर्जित रजेचे रोखीकरण केवळ अशा कर्मचा-यांना लागू होते ज्यांना व्हेकेशन लागू होत नाही अशांना देणे शक्य आहे. तक्रारदाराने परिनियम २०० (बी) (जे) चा आधार घेतला आहे तो अप्रस्तुत आहे कारण ती तरतूद अर्जित रजा घेतल्यानंतर त्या कालावधीच्या पगाराबाबत आहे ती रजेच्या रोखीकरणाबद्दल नाही. रोखीकरणाची तरतूद नसल्याने तक्रारदार यांची रजा रोखीकरणाची मागणी मान्य करता येणार नाही असे ही समिती या निष्कर्षास येते.

३. तक्रारदार यांनी आपण तक्रार निवारण समितीकडे नियम व नियमित पगार भत्तेंसहित मिळणेबाबत तक्रार केल्यापासून प्राचार्य, उपप्राचार्य व मा.व्यवस्थापन यांनी आपल्यावर सुडबुध्दीने कारवाया केलेल्या आहेत अशा स्वरूपाची तक्रार केली आहे. समितीसमोर तक्रारदार यांनी त्यांच्या रिजॉइंडर कम ॲफिडेव्हीटमध्ये कोरोना कालावधीतील सव्वा तीन महिन्यांचे प्रलंबित वेतन मिळणेबाबत दाद मागितलेपासून तक्रारदार यांचे मे २०२३ ते ॲफिडेव्हीट दाखल तारखेपर्यंतचे वेतन रोखले असून हजेरी नोंदीस प्रतिबंध करणे, मस्टर उपलब्ध न करणे, मस्टरवर रेषा मारणे असे प्रकार केले आहेत. तसेच दि. ०६/११/२०२३ पासून तक्रारदार यांना महाविद्यालयात प्रवेश करण्यास मनाई केली आहे. जाबदार यांनी तक्रारदार यांची अन्यथा सेवासमाप्ती केलेने यासंदर्भात तक्रारदार यांनी मे. विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे येथे अपील क्र. २२/२३ दाखल केले आहे.

उपरोक्त बाब अवलोकनी घेता, या समितीसमोर दोन्ही पक्षांकडून थकित वेतन व नियमित वेतन देय आहे किंवा कसे याबाबत दोन्ही पक्षांकडून पुरावा दाखल केलेला नाही तसेच सदरची बाब मे. विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे येथे न्यायप्रविष्ट असल्याने याबाबत सनिती निर्णय घेवू शकत नाही.

दि. ०२/०५/२०२३ नंतर तक्रारदार यांची अन्यायकारकरित्या पदावनती करण्यात आलेबाबत तक्रारदार यांनी समितीसमोर दाखल केलेल्या लेखी युक्तीवादामध्ये नमूद केलेनुसार त्यांनी सेवासमाप्तीबाबत मे.विद्यापीठ न्यायाधीकरण, पुणे यांचेकडे अपील क्रं.२२/२०२३(एस) दाखल केले आहे. त्यामुळे विभाग प्रमुख पदावरून गच्छंती हा मुद्दा सध्या गैर लागू झालेने खारीज करावा. परंतू

मा.विद्यापीठ न्यायाधीकरण, पुणे यांचे निकालानंतर तक्रारदारास जाबदार यांचे महाविद्यालयात सेवेची संधी मिळाल्यास व तशी गरज भासलेस सदरील विभाग प्रमुख पदाबाबत पुनश्चः न्यायाची मागणी करण्याचा हक्क अबाधित ठेवत असल्याची विनंती केली आहे. तक्रारदार यांची सदरची विनंती समितीकडून मान्य करण्यात येत आहे.

समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. विद्यापीठाने वेळोवेळी व्हेकेशनबाबत निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार याचां सन २०१७ पासून ते अर्ज दाखल दिनांकापर्यंतचा (सन २०२० कोरोना कालावधी वगळून) व्हेकेशनचा ताळेबंद तयार करून त्यामधून तक्रारदार यांना प्रत्यक्ष देण्यात आलेल्या व्हेकेशन वजा करून उर्वरीत व्हेकेशन प्रचलित नियमानुसार त्यांचे खाती अर्जित रजेत हा आदेश मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत जमा कराव्यात.

३. सदरची कार्यवाही हा आदेश मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 12 AUG 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)